**निशाणी क्र.३५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.७ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सतिष नामदेव सुर्यवंशी,

वय – ४२ वर्षे, व्यवसाय– मजूरी,

पत्ता – रा.सारोळा रोड, लातूर ता.लातूर, जि.लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः–**

दिनांक ३०.११.२०२५ रोजी मला जप्ती पंचनामा करण्यासाठी एम.आय.टी. कॉलेज समोर लातूर–रेणापूर रोडवर लातूर येथे बोलावले होते. त्यावेळी माझ्यासोबत नवाब शेख आणि पोलीस होते. पोलीसांनी माझ्या पंचनाम्यावर सह्या घेतल्या. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीकडून १०८ चांदीचे पैजन जोड जप्त केले नव्हते. तो पंचनामा मी वाचून पाहिला नव्हता. (आता मला प्रस्तुत कामातील दि. ३०.११.२०२५ रोजीचा नि.२५ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला) त्या जप्ती पंचनाम्यावरील सही माझी आहे. त्यामधील मजकुर मी वाचला नव्हता.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

०२. हे म्हणणे खरे नाही की, नि.२५ वरील पंचनामा माझ्या समक्ष झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा वाचून मी त्याच्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमाल चांदीचे १०८ पैजन जोडी माझ्या समक्ष आरोपीच्याकडून जप्त केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कडून इतर गुन्हयातील चांदीचे चैन, करदोडे आणि अंगठ्या

जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. टी.आर.पाटील यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.03.25 11:09:43 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–२४/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा